9 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'ग्रीन कार'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाच्या वाहनांच्या ताफ्यात शनिवारी पर्यावरणपूरक वाहन (ग्रीन कार) दाखल झाली. आज असलेल्या 'नो व्हेईकल डे'चे औचित्य साधून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ही ग्रीन कार सुरक्षा विभागास प्रदान करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या ८५० एकर परिसरात सुरक्षा विभागाकडून दिवसरात्र पेट्रोलिंग करण्यात येते. त्यासाठी पूर्वी एकच वाहन विभागाकडे होते. त्यामुळे इंधनावरील खर्च मोठा होता. अलीकडेच या ताफ्यात एक मोटारसायकल दाखल झाली. त्यामुळे हा खर्च कमी झाला. आता पर्यावरणपूरक वाहन दाखल झाल्यामुळे हा खर्च आणखी कमी होणार आहे. या वाहनामध्ये आठजण बसू शकतात. त्यामुळे कॅम्पसमध्ये पेट्रोलिंगसाठी अत्यंत उपयुक्त वाहन बनले आहे. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, सुरक्षा अधिकारी वसंत एकले यांच्यासह काही विद्यार्थिनींना या ग्रीन कारमध्ये बसवून कॅम्पसमध्ये फेरफटका मारला. वाहनाची चाचणी घेतल्यानंतर कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, हे वाहन वायू तसेच ध्वनी प्रदूषणमुक्त आहे. याचा देखभाल खर्चही जवळपास शून्य आहे. वाहनाला आरटीओ परवाना अथवा चालक परवान्याचीही आवश्यकता नाही. या ग्रीन कारमुळे विद्यापीठाचा इंधनावरील खर्च बराच कमी होणार आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये ग्रीन कारमधून फेरफटका मारताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. विलास नांदवडेकर आदींसह मान्यवर.**

### अशी आहे ग्रीन कार

ग्रीन कार पाच बॅटरींवर चालते. या बॅटरी सहा तासांत पूर्ण चार्ज होतात आणि त्यावर साठ किलोमीटर इतके अंतर पार करता येते. यासाठी केवळ ५० रुपये प्रतिदिन इतका खर्च येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

9 JAN 2017

Times of India

# Varisty adds green car for campus patrolling

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has introduced an eco-friendly Green car in its existing patrolling vehicles for keeping a watch at its vast 843 acre campus.

The car runs on battery and does not need any kind of Regional Transport Office (RTO) clearance and can run up to 60 kms in a single charge.

Vice-chancellor, SUK, Devanand Shinde said unveiled the green car on Saturday. He said, "Earlier only one four-wheeler use to patrol around the campus which resulted in high fuel expenses. In order to curb the fuel expenses, a few days ago a two-wheeler was added in this convoy."

He added, "The green car charges in six hours flat and generally costs Rs 50 per day of expenses, which will help university in lessening the fuel charges."

TOI



The car runs on battery and does not need any kind of Regional Transport Office clearance

## CAMPUS BUZZ

**NSS camp organised at D Y Patil College:** The city based D Y Patil College of Engineering and Technology had organized a one day National Service scheme (NSS) camp at Kushire village in the Panhala taluka earlier last week. More than 100 students participated in the camp under which the social activities like discussions, medical check-up, and cleanliness drive were organized.

A college official said, "The students also interacted with the local school kids. The volunteers had also organised an eye-check-up camp where over 100 villagers participated. An eye donation drive too was also organised during the same time, during which around 83 volunteers and the villagers filled in the forms for the eye donation."

**NSS camp inaugurated at Vivekanand College:** A 10-days NSS camp was inaugurated at the Vivekanand College earlier last week where MLA Satej Patil was invited for the inaugural function. He said, "Vivekanand College has achieved a lot and is the pride of the Kolhapur city. He appealed students to be focused about their aim and that the initiatives under the NSS are the ones which keep an individual focused."

**Lecture on competitive exam conducted:** Centre for Coaching Classes Entry into Services of the Shivaji University, Kolhapur (SUK) arranged a lecture on facing the competitive exam earlier last week.

A SUK official said, "The lecture was conducted at the Rajarshi Shahu Hall of the main administrative building in the SUK premises, where Vishal Londhe, assistant commissioner, Social welfare department Kolhapur, offered his guidance on how to prepare for a competitive exam."

Londhe said, "A person who takes efforts on developing the overall personality, can achieve success in his life. While facing competitive exam, a student must have complete knowledge about the said subject. One can achieve it by developing certain studying pattern for themselves."

**Workshop for people with disability at SUK:** A one-day workshop for people with the disabilities was organised within the SUK premises on January 6. Vice-chancellor, SUK, Devanand Shinde said, "For an average person keeping the confidence intact and going is quite a tedious task, however the people with disabilities have lots of confidence and hence they have a higher place in the society."

- 9 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# विद्यापीठाच्या ताफ्यात 'ग्रीन कार' दाखल

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यापीठ परिसरात मारला फेरफटका

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाच्या वाहन ताफ्यात शनिवारी पर्यावरणपूरक वाहन (ग्रीन कार) दाखल झाली. 'नो व्हेईकल डे'चे औचित्य साधून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ही ग्रीन कार सुरक्षा विभागास प्रदान करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या ८५० एकर परिसरात सुरक्षा विभागाकडून दिवसरात्र ठराविक वेळेत गस्त (पेट्रोलिंग) घालण्यात येते. त्यासाठी पूर्वी एकच वाहन विभागाकडे होते. त्यामुळे इंधनावरील खर्च मोठा होता. अलिकडेच या ताफ्यात एक मोटरसायकल दाखल झाली. त्यामुळे हा खर्च कमी झाला. आता पर्यावरणपूरक वाहन दाखल झाल्यामुळे हा खर्च आणखी कमी होणार आहे. या वाहनाची एकूण आसन क्षमता आठ असून कॅम्पसमध्ये पेट्रोलिंगसाठी अत्यंत उपयुक्त आहे.



कोल्हापूर : पर्यावरणपूरक वाहन (ग्रीन कार) च्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वसंत एकले आदी.

पाच बॅटरींवर हे वाहन चालते. या बॅटरी सहा तासांत पूर्ण चार्ज होतात आणि त्यावर साठ किलोमीटर इतके अंतर पार करता येते. यासाठी केवळ ५० रुपये प्रतिदिन इतका खर्च येणार आहे.

कुलगुरु डॉ. शिंदे यांनी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, सुरक्षा अधिकारी वसंत एकले यांच्यासह काही विद्यार्थिनींना या ग्रीन कारमध्ये बसवून कॅम्पसमध्ये फेरफटका मारला.

या वाहनाला आरटीओ परवाना अथवा चालक परवान्याचीही आवश्यकता नाही. असे बहुमोल वाहन सुरक्षा ताफ्यात दाखल झाल्यामुळे विद्यापीठाचा इंधनावरील खर्च बराच कमी होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

9 JAN 2017

लोकमत

# 'दिव्यांग व्यक्ती'मध्ये मोठा आत्मविश्वास

## देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळा

कोल्हापूर : दिव्यांग व्यक्तींमध्ये मोठा आत्मविश्वास असतो. परिस्थितीवर नियंत्रण कसे ठेवावे, स्वाभिमानी आयुष्य कसे जगावे, याचे उत्तम उदाहरण या व्यक्ती आहेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठात केले.

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी लेखिका सोनाली नवांगुळ प्रमुख उपस्थित होत्या. सोनाली नवांगुळ यांनी मनोगत व्यक्त केले.

### इंद्रजित सरगरला इलेक्ट्रिक चारचाकी स्कूटर

या कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थी इंद्रजित सरगर याला इलेक्ट्रिक चारचाकी स्कूटर कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमास विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्रा. सी. ए. लंगरे, डॉ. पी. बी. बिलावर, आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी स्वागत केले. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुनील बिर्जे यांनी आभार मानले. कार्यशाळेत रमेश साठे, धनंजय भोले, राजेश आसुदानी, इंग्रजी अधिविभागाचे सहायक प्राध्यापक मनोहर वासवाणी यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 9 JAN 2017

लोकमत

# स्पर्धा परीक्षेसाठी सखोल ज्ञान हवे

## विशाल लोंढे : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**कोल्हापूर :** स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना विषयांचे सखोल ज्ञान घेणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी स्वत:ची विशिष्ट अभ्यासपद्धती निर्माण करून यश प्राप्त करणे शक्य आहे, असा विश्वास समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांनी मंगळवारी येथे केला.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्रातर्फे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त व्याख्यानात 'स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना' यावर ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

लोंढे म्हणाले, व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधणारे विद्यार्थीच यशोशिखर गाठू शकतात. महिला सर्वच क्षेत्रांत अग्रेसरपणे कार्यरत आहेत. आपल्या कार्यप्रणालीमध्ये आमूलाग्र बदल घडविण्यासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेतला पाहिजे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी होऊन विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षण, ऊर्जा समाजाच्या उन्नतीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. स्वत:ला न फसविता सजगतेने अभ्यास केल्यास निश्चित यश मिळते. कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी जागतिक चालू घडामोडींचा काळजीपूर्वक अभ्यास करणे आवश्यक आहे. आजचा सूज्ञ विद्यार्थीच उद्याचा चांगला समाज निर्माण करू शकतो. कार्यक्रमात सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. सचिन कदम यांनी परिचय करून दिला. अमित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. (प्रतिनिधी)



### लोंढे म्हणाले...

- विद्यार्थ्यांनी मनामध्ये ऊर्मी बाळगून ध्येय प्राप्तीसाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजेत.
- उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करून जिद्दीने, चिकाटीने अभ्यास करावा.
- सजगतेने घेतलेला निर्णय व जलद कृतिशीलता विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी बनवते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2017

पुढारी

# निरोगी पिढीसाठी निसर्गोपचार : डॉ. बुवा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

निरोगी जीवनशैलीची आज अत्यंत आवश्यकता असून ती निसर्गोपचाराच्या माध्यमातून प्राप्त करणे शक्य आहे. निरोगी आणि सक्षम पिढीसाठी निसर्गोपचाराची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. सुमन बुवा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग आणि आयुर्वेदिक ॲक्युप्रेशर असोसिएशनतर्फे आयोजित निसर्गोपचार शिबिर उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. शिबिरासाठी मुंबई, सातारा, सिंधुदुर्ग आदी ठिकाणांहून चाळीस विविध क्षेत्रांतील उपचारक उपस्थित होते. डॉ. सारंग पाटील, डॉ. सुशील पाटील, डॉ. स्मिता अनगळ, डॉ. चंद्रशेखर मोडक डॉ. टिकेकर आदींनी मार्गदर्शन केले. डॉ. नामदेव पाटील यांनी स्वागत तर सूत्रसंचालन डॉ. मोडक यांनी केले. आभार प्रा. यशोधन बोकील यांनी मानले.

-9 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत

# यंदा पदवी प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने

**युजीसीच्या आदेशाचे होणार पालन** देशातील सर्वच विद्यापीठातील प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी केंद्राने विकसित केले 'ॲप'

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

युजीसीच्या आदेशावरुन देशभरातील विद्यापीठात पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पद्धतीने होणार आहे. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठानेही या प्रवेशाचे नियोजन करण्यासाठी एक समिती नेमली आहे. या समितीचे अध्यक्ष न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचा आराखडा तयार केला आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे सोपे जावे म्हणून सर्व विद्यापीठांसाठी राज्य सरकार एकच

- सर्व महाविद्यालयांची गुणवत्ता यादी विद्यापीठ जाहीर करणार
- जून २०१७ पासून तीन राऊंडमध्ये प्रवेश देणार
- विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहितीपत्रिका प्रसिद्ध होणार

सॉफ्टवेअर तयार करणार आहे. या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून यंदा पदवी प्रथम वर्षातील सर्व शाखांचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने दिले जाणार आहेत.

सरकारने विकसित केलेल्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून सर्वच महाविद्यालयांना प्रवेश देणे अपरिहार्य आहे. अभियांत्रिकी प्रथम वर्षाचे प्रवेश अर्ज एकाच छताखाली भरले जातात. त्याप्रमाणे पदवी प्रथम वर्षाचे प्रवेश एकाच छताखाली मिळणार आहेत. विद्यार्थी इतर कॉलेजवरील प्रवेशासाठी पर्याय देऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा आणि श्रमही कमी होणार आहेत.

अनुदानित महाविद्यालयांमध्ये १०० टक्के प्रवेश मेरीटवर दिले जाणार आहेत. तर विनाअनुदानित तुकडी आणि अभ्यासक्रमांच्या ८० टक्के जागा केंद्रीय पद्धतीने भरल्या जाणार असून २० टक्के जागा व्यवस्थापन कोट्यातून भरल्या जाणार आहेत. विद्यापीठ अंतर्गत तिन्ही जिल्ह्यातील २८० महाविद्यालयांची गुणवत्ता प्रवेश य[ादी] शिवाजी विद्यापीठ प्रसिद्ध करणार आहे. कोणत्याही महाविद्यालयाने स्वतंत्र प्रवेश यादी प्रसिद्ध करू नये, असे परिपत्रक विद्यापीठाने प्रसिद्ध केले आहे. तीन फेऱ्यांमध्[ये] प्रवेश दिले जाणार आहेत. शासन नियमाप्रमाणे सर्व प्रवेश दिले जाणार आहेत. तर सीमाभागातील विद्यार्थ्यांना २ टक्के राखीव जाग[ा] ठेवाव्यात, असे पत्र विद्यापीठातील एका प्राध्यापकाने दिले आहे. त्यामुळे सीमाभागातील विद्यार्थ्यांनाही न्याय मिळणार आहे.



पान ६ प

यंदा पदवी प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने

पान १ वरून

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत आवडता विषय कोणत्या महाविद्यालयात आहे, याची माहिती ऑनलाईन पहावयास मिळणार आहे. या यादीनुसार पर्यायी अर्ज भरण्याची परवानगी विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र प्रवेश घेण्याची गरज नाही. विनाअनुदानित महाविद्यालय, विषय किंवा अभ्यासक्रमांना व्यवस्थापन कोट्यातून आवश्यकतेनुसार जागा वाढवून देण्याची शक्यता आहे. तर अनुदानित महाविद्यालयाला ४० टक्के जागा वाढवून दिल्या जाणार आहेत.

पूर्वी एखाद्या महाविद्यालयामध्ये गुणवत्ता यादीनुसार प्रवेश मिळाला नसेल तर एजंट व संस्थाचालकांकडून विद्यार्थ्यांची फसवणूक केली जात होती. मात्र आता त्यांना चाप बसणार आहे. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या प्रवेशाची यादी कमिटीस सादर केली जाणार आहे. त्यानंतर ऑनलाईन प्रवेश अर्जांची संगणकीय छाननी होऊन अंतिम प्रवेश यादी जाहीर केली जाणार आहे. या यादीनुसार विद्यार्थ्यांनी दिलेला पसंती क्रमांक, आरक्षण व गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना योग्य त्या कॉलेजमध्ये प्रवेश दिले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना केंद्रीय प्रक्रियेनुसार प्रवेश मिळालेल्या कॉलेजमध्येच प्रवेश घेणे बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे सर्वच महाविद्यालयांना त्यांच्या क्षमतेनुसार विद्यार्थी संख्या मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांना न्याय मिळेल : प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे**

पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पद्धतीने होणार आहे. त्यामुळे कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांना ही प्रवेश प्रक्रिया बंधनकारक राहणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना एकाच छताखाली सर्व सुविधा मिळणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सर्व महाविद्यालयांसाठी एकच अर्ज करावयाचा आहे. ही प्रवेश प्रक्रिया जून २०१७ पासून लागू होणार असून, नियमावली तयार झाली आहे. विद्यार्थ्यांनी जवळच्या महाविद्यालयात अर्ज भरून पसंतीक्रम द्यायचा आहे. त्या अर्जावर अनुदानित किंवा विनाअनुदानितसाठी भरला आहे हे लिहावयाचे आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सर्वच महाविद्यालयांसाठी एकच ऑनलाईन माहितीपत्रिका प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये तिन्ही जिल्ह्यातील प्राचार्य, विद्यार्थी, पालक प्रतिनिधींचाही सहभाग आहे.

**प्रवेश प्रक्रिया समितीतील सदस्य**

प्रवेश प्रक्रिया समितीमध्ये अध्यक्ष प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे, सदस्य डॉ. जे. एस. बागी, डॉ. व्ही. आर. घोरपडे, प्राचार्य व्ही. बी. ताम्हणकर, प्रा. अमित वैद्य, डॉ. व्ही. जे. ढेरे, एस. एस. खराडे यांचा सहभाग आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

-9 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स



# रेल्वे स्थानक झाले चकाचक

## शिवाजी विद्यापीठाच्या एनएसएसतर्फे स्वच्छता मोहीम

▶▶ **पूजा कदम**
सीसीआर मास कम्युनिकेशन,
शिवाजी विद्यापीठ

शुक्रवारची सकाळ... आठची वेळ... थंडी असल्याने धुक्याची दुलई अद्याप दूर झालेली नव्हती. सूर्याची कोवळी किरणे पडली होती... याच वातावरणात कोल्हापुरातील रेल्वे स्थानकावर असंख्य मुले-मुली, अधिकारी उपस्थित होते. बघणाऱ्यांना वाटले की एखाद्या कॉलेजची ट्रीप जाणार आहे म्हणून एवढी गर्दी आहे. ट्रेन आली तरी मुले जशीच्या तशीच उभी. थोड्या वेळाने महापालिकेचे कर्मचारी हातात साफ सफाईचे सामान घेऊन आले. प्रत्येक विद्यार्थ्याला झाडू, टोपली, हातमोजे, मास्क दिले. विद्यार्थ्यांनी मास्क घालून सफाईला सुरुवात केली व अवघ्या तीनच तासात संपूर्ण स्थानक चकचकीत झाले.

स्वच्छ भारत मोहिमेच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. २१ ते २३ डिसेंबर या तीन दिवसांत कोल्हापुरातील मध्यवर्ती बसस्थानक, महालक्ष्मी मंदिर परिसर व रेल्वेस्थानक या ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. तीन दिवस सकाळी आठ वाजता विद्यार्थी ठरलेल्या ठिकाणी जमायचे व काही तासांतच तो परिसर स्वच्छ करायचे. या उपक्रमात २०० ते २५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनाही खूप काही शिकायला मिळाले. नवे काही शिकण्याची संधी मिळाली. ग्रुपच्या माध्यमातून काम कसे करता येते, सामाजिक उपक्रमासाठी एकतेचे महत्व काय आहे हेही सर्वांना कळाले.

CCR

कोल्हापूरला स्वच्छतेच्या बाबतीत नुकताच राज्य सरकारचा पुरस्कार मिळाल्याने कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना महापालिकेचे सहकार्य मिळाले. महापालिकेतर्फे साहित्य व डंपर देण्यात आले. तसेच मनपाचे कर्मचारीही या अभियानात सहभागी झाले होते. कोल्हापूरच्या स्वच्छतेसाठी प्रशासन जनतेबरोबर आहे, हे यातून दिसून आले.



घरोघरी महिला, मुली सफाई करताना दिसतात. मुले यात सहभाग घेत नाहीत. पण एनएसएस, एनसीसी राज्यस्तरीय व राष्ट्रीय शिबिरामुळे विद्यार्थ्यांना कामाची सवय लागली. स्वच्छतेच्याबाबतीत सुरू असलेली जनजागृती तरुणांमध्ये बदल घडवून आणण्याचे काम करत आहे. शिबिराचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे शिबिराच्या माध्यमातून मुलींनी खूप उंच भरारी घेतल्याचे दिसते.

स्वच्छ भारताचे स्वप्न महात्मा गांधीजींनी पाहिले होते. ते पूर्ण करण्याची वेळ आता आली आहे. यासाठी गावपातळीवरही मोठ्या प्रमाणात काम होत आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव अशा योजना राबविल्या जात आहेत. त्याला लोकांचा प्रतिसादही मिळत आहे. आता खऱ्या अर्थाने भारत स्वच्छ आणि समृध्द होण्याच्या दृष्टीने वाटचाल करीत आहे. एनएसएसचे प्रकल्प अधिकारी, इतर प्राध्यापक यांचाही सहभाग होता. एन. एस. एस. चे समन्वयक डी. के. गायकवाड यांनी उपक्रम यशस्वी होण्यासाठी मौलिक मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 9 JAN 2017

लोकमत

# मुलांवर विश्वास ठेवला तरच यश

## रेश्मा माने : वडणगे येथील शिवाजी विद्यामंदिरात गुणवंतांचा सत्कार

**वडणगे :** पालकांनी आपल्या मुलांवर विश्वास ठेवून त्यांना हवे ते क्षेत्र निवडण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे तरच यशाचे शिखर गाठण्याचा मुलांकडून निश्चित प्रयत्न होतो. आजवरच्या माझ्या यशात कुटुंबीयाच्या असणाऱ्या योगदानातून मी घडलो असल्याचे सुवर्णकन्या रेश्मा अनिल माने हिने सांगितले.

वडणगे (ता. करवीर) येथील शिवाजी विद्यामंदिर येथे विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात रेश्मा माने बोलत होती. अध्यक्षस्थानी सरपंच जयश्री नाईक होत्या.

तत्पूर्वी राष्ट्रकुल स्पर्धेत रेश्मा माने हिने सुवर्णपदक राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत स्थान मिळविलेल्या प्रेरणा व ऋचा आळवेकर, के.टी.एस. परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी यांचा तसेच शाळेला मदत केलेल्या दानशूर व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.



वडणगे (ता. करवीर) येथे शिवाजी विद्यामंदिर यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात रेश्मा मानेचा माजी शिक्षण उपसंचालक गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सरपंच जयश्री नाईक, प्रतिभा होनखांबे, उमेश पाटील, इंद्रजित पाटील, अनिल माने व शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमास माजी शिक्षण उपसंचालक गायकवाड, बीट विस्तार अधिकारी यादव, शालेय पोषण अधीक्षक वसुंधरा पाटील-कदम यांची तसेच पालकांतून राजेंद्र पोवार व नारायण पोतदार यांची मनोगते झाली.

मुख्याध्यापक स्नेहल पाटील यांनी प्रास्ताविक, तर प्रा. धुमाळ यांनी आभार मानले. यावेळी ग्रामपंचायत सदस्या प्रतिभा होनखांबे, उमेश पाटील, एकनाथ कचरे, इंद्रजित पाटील, अनिल माने, आदींसह शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. (वार्ताहर)